**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences
ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal
Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 4, APRIL - 2022
Publication Date: 30/04/2022

DOIs:10.2018/SS/202204010 --:-- Research Article

# “सरकारने केलेल्या तीन कृषी कायद्याविरोधात शेतकरी आंदोलन”

**डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे**
**प्राध्यापक मराठी विभाग**
**श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. औरंगाबाद**
Email - wawgesavita@gmail.com

केंद्र सरकारने कृषी व्यापारामध्ये सुधारणा करण्यासाठी तीन नवीन कायदे मंजूर केले. वास्तविक पाहता हे तीनही कायदे शेतकऱ्यांवर लादले होते. शेती सुधारणांच्या नावाखाली मोदी सरकारकारणे लागू केलेले तीन कृषी कायदे मागे घेण्याची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली. ज्या पद्धतीने कृषी कायदे लागू केलेत त्याच पद्धतीने ते मागे घेण्यात आले. कृषी कायदे लागू करतांना जसा कोणाचाही विचार किंवा विचारविनिमय करण्यात आला नाही तसा तो मागे घेतांनाही करण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे सरकारची निर्णय पद्धती व कार्यपद्धती पारदर्शक नसल्याचा ठळक असा हा पुरावा आहे. त्यामुळे सरकारच्या हेतू विषयी नाराजी व संशयाचे बीज सर्वसामान्य जनतेच्या मनात पेरल्या गेले. त्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन केले. परंतु संसदेत अध्यादेश काढत कायद्याची बाजू सांगून आंदोलन कर्त्यांचा आवाज हा दाबण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. आंदोलन कर्त्याची तयारी बघून दोन वर्ष कृषी कायद्यांना स्थगिती देण्याची सरकारची तयारी ही प्रश्न निर्माण करणारी होती. दोन वर्षाची कायदे अध्यादेशाने लागू करण्याचे आणि अध्यादेशाला संसदेत मंजूर करतांना घाई करण्याचे कारणच काय होते? ज्यांनी निर्णय घेतला, ज्यांच्यासाठी निर्णय घेतला अशा शेतकऱ्यांशी चर्चा केली असती तर कृषी कायदे लागू करण्यामागची भूमिका स्पष्ट झाली असती. पण असे होतांना दिसत नाही. वर्षभर शेतकरी आंदोलन करत होते परंतु सरकारने त्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले होते. एवढेच नाही तर साम, दाम, दंड, भेद वापरून शेतकरी आंदोलन मोडून काढण्यासाठी वापरले होते. परंतु तरीही शेतकरी मागे हटले नाही. त्यांचा विजय हा ऐतिहासिक ठरला. इ.स.१९८० च्या दशकात शरद जोशी सारख्या नेत्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आंदोलित करण्यात यश मिळविले होते. त्या नंतर होणारे हे शेतकऱ्यांचे पहिलेच आंदोलन होते. परंतु या आंदोलनात कोणीही नेता नसतांना आंदोलन उभे राहिले. फक्त आंदोलन उभे राहिले नाही तर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ते टिकून राहिले. सत्तेच्या क्रूरते सोबत माध्यमांचा अपप्रचार सहन करावा लागला.

भारत हा कृषिप्रधान देश आहे असं अभिमानाने म्हणण्याचे दिवस संपले, देशातील इतर लोकांना आणि पुढाऱ्यांना आता शेतकऱ्यांची गरज उरली नाही. कृषिप्रधान आणि विविधता पूर्ण असलेला हा देश मुळापासून विस्कटून टाकला जात आहे. शेती संबंधी जे कायदे तयार झाले, ते तीन कायदे मागे घ्यावेत या मागणीसाठी नऊ महिन्यांपासून पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि देशभरातील विविध राज्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सर्वस्व पणाला लावून सिंधू बॉर्डर, टिकरी बॉर्डर, गाजीपुर बॉर्डर या सर्व दिल्लीच्या सीमांवर लोकशाही मार्गाने आपल्या अस्तित्वाची लढाई लढत आहेत. हा फक्त शेतकऱ्यांचा प्रश्न नाही तर देशातल्या प्रत्येक नागरिकाचा प्रश्न आहे. कारण जो शेतकरी अन्नधान्य पिकवितो त्या पिकविलेल्या अन्नाला जागण्याची वेळ आली आहे.जे शेतकऱ्याने अन्नधान्य पिकविले ते आपण खातो त्या खाल्लेल्या अन्नाला जात-पात,धर्म,पंथ विसरुन जगण्याची वेळ आली आहे. या भारत देशात सर्वसामान्य लोक, कष्टकरी, नोकरदार, मध्यमवर्गीय निम्नमध्यमवर्गीय, निम्नवर्गी अशा सर्व नागरिकांसाठी हा ऐरणीचा प्रश्न असणार आहे. येणाऱ्या काळात हा प्रश्न जीवन-मरणाचा असणार आहे. सरकारने केलेले कायदे हे मोजक्या बड्या भांडवलदारांच्या हिताचे आहेत. जो देशाला रोज जगवितो त्यांच्यासाठी हे कायदे नाहीत, ही खंत फक्त उरी बाळगून फायदा नाही. त्यासाठी सर्वसामान्य जनतेने एकजूट होणे गरजेचे आहे. जो जगाचा पोशिंदा आहे त्याला जर मारायला निघाले तर आपला विनाश अटळ आहे. थोड्या सुखासाठी हा विनाश सहन करणे कितपत हिताचे आहे. याचा विचार करण्याची गरज आता आली आहे. प्रत्येकाने आपला आवाज उठविला पाहिजे.

आपण ज्या राज्यात राहतो त्या राज्याचे स्वराज्य निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी काय हाल-अपेष्टा सहन केल्या तो इतिहास आठवण्याची गरज आहे. देशाला रोज जागविणारा शेतकरी अन्नदाता आता देशाचा रक्षण

करता म्हणून ऊन-वारा-थंडी- पावसात या लढ्याला स्वतःच्या खांद्यावर घेऊन ठामपणे उभा आहे. ज्या ज्या वेळी देशावर संकट आले त्या त्या वेळी या शेतातील शेतकरी त्या विरोधात ठामपणे उभा राहिलेला आहे. म्हणूनच शेतकरी हा आपला कणा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शेतकऱ्यांनी आंदोलन केले त्यामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला. कृषी कायदे सरकारने मागे घेतले, परंतु जी सुधारणावादी आणि सरकारी विचारवंताची अजून कुजबुज ऐकायला मिळत आहे यांच्या मते असे की, सरकारने कृषी कायदे मागे घेण्याचा जो निर्णय घेतला त्यामुळे शेतीतील सुधारणा मागे पडतील आणि पुढे सरकारला कोणताही म्हणजे शेतकऱ्यांच्या बाबतीत जर निर्णय घ्यायचा असेल तर ते घेणार नाही. याचाच अर्थ असा होतो की, राज्यातील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शेतकरी मतदारांना खूष करण्यासाठी हे तीन कृषी कायदे मागे घेण्याचा फार्स केला आहे की काय? याबद्दल संशय / साशंकता वाटते.

थोडक्यात सांगायचे झाल्यास या आंदोलनातून भांडवली शेतीच्या चक्रात अडकलेल्या सर्वच प्रकार शेतकऱ्यांच्या सुखी आणि समृद्ध जीवनाची आशा आता मावळत चालली आहे. या आंदोलनातून शेतकऱ्यांची दुर्दशा तर झालीच आहे आणि त्यांच्यात चीड निर्माण झाली आहे. त्यामुळे आता शेतकरी वर्ग एक होऊ पाहतो आहे. सरकार विरोधात शेतकरी एकजूट होऊन रडू पाहतो ही एक आनंदाची व सुखदायी बाब आहे. याची सुरुवात पंजाब पासून जरी सुरू झाली असली तरी त्याचे पडसाद सर्व जगभर पसरलेले आहेत. वास्तविक पाहता आत्ताचे हे आंदोलन पूर्वीच्या आंदोलन यापेक्षा वेगळे आहे. शेतकऱ्यांनी केलेल्या क्रांतिकारी शेतकरी आंदोलनाशी तुटलेली नाळ जोडणारे हे आंदोलन आहे. त्यामुळे हे आंदोलन एका वेगळ्या आणि नवीनच शक्यतेकडे वाटचाल करीत आहे.

ज्या पद्धतीने सरकारने कायदे लागू केले, आणि मागे सुद्धा घेतले त्यावरून असे स्पष्ट होते की, जेव्हा कायदे मागे घेण्याची वेळ आली तोपर्यंत त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना त्याची काहीच कल्पना नव्हती. मग असे असतांना मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन संसदेने त्या कायद्यांना मंजुरी दिली असल्याने मागे घेतांनाही मंत्रिमंडळात चर्चा आणि निर्णय होणे महत्त्वाचे होते. परंतु तसे न होता काही मोजक्याच विश्वासातील मूठभर नोकरशाह यांच्यातच चर्चा करून निर्णय घेतले जातात. आणि मंत्रीमंडळ त्यांच्या होकारातच हो मिळवितात (री ओढतात) आणि याच पद्धतीने कृषी कायद्याबद्दल तेच घडले. ज्यांनी ज्यांनी या कायद्यांला विरोध केला त्यांना दलाल, खलिस्तानी,देशद्रोही म्हणून हिणवले गेले. म्हणजेच याचाच अर्थ आम्ही जे निर्णय घेऊ ते तुम्ही मान्य करा असा होतो. परस्परांमध्ये संवाद किंवा विचारविनिमय न करता आपलेच म्हणणे खरे असे ठरवून घेतलेले निर्णय मान्य करण्यास भाग पडणे परंतु, या मानसिकतेमुळे व कार्यपद्धतीमुळे देशांमध्ये अराजकता माजू शकते, संवाद संपून विसंवाद वाढू शकतो याचा कोणीच विचार केला नाही. व त्याचाच फटका कृषी कायद्यांना बसला आहे. जर या कायद्यांमुळे खरोखरच कृषी सुधारणा झाल्या असत्या तर हे सगळे टळले असते. परंतु या निर्णयामुळे फक्त विनाश होऊ शकतो हे कळायला जरा उशीरच झाला असे म्हणावे लागेल.

स्वातंत्र्यानंतर सर्वच क्षेत्रात लोकांना पचायला आणि पटायला कठीण जाईल अशा सुधारणा राबविण्यात सर्व सरकारांना यश आले असे म्हणता येईल. परंतु या सर्व सुधारणा लोकांना पटवून देण्यात सर्व पंतप्रधान यशस्वी झाले कारण त्यांनी विरोधकांशी संवाद साधण्याची त्यांची जी कला /हातोटी होती ती त्यांनी वापरली. परंतु आत्ताच्या मोदी सरकारने आणलेल्या कायद्याच्या आशयात फार फरक आहे असे नाही. परंतु ज्या पद्धतीने तेव्हाच्या सरकारने संवादाच्या रूपाने यश संपादन केले ते आत्ताच्या मोदी सरकार न केल्याने असंतोष उफाळून आला आहे. सुधारणा राबविण्यासाठी दांडगाई करून उपयोग नाही तर समजुतीच्या न्यायाने व सर्वांच्या सहकार्याने संवादाने जर सुधारणा राबविल्या असत्या तर त्याचा फायदा सर्वांनाच झाला असता. परंतु राजकीय हित लक्षात घेता तसेच करणे गरजेचे होते परंतु मोदी सरकार याला कारणीभूत ठरले.

**संदर्भ ग्रंथसूची :**


1) लेलीनवादी लाल निशान पक्षाचे मुख्यपत्र – डिसेंबर, २०१९.
2) शेती कायद्यांना शेतकऱ्यांच्या तडाका, - कॉम्रेड भीमराव बनसोड,- फेब्रुवारी, २०२१.
3) दिव्य मराठी वर्तमानपत्र - डिसेंबर, २०२१.
4) महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्र - डिसेंबर, २०२१.
5) श्रमिक विश्व मासिक – १८ डिसेंबर, २०२१.